सत्य | निर्भीड | लोकाभिमुख

बातमीला पुणेरी फोडणी !

# पुणेरी तडका

पुणे आणि परिसरातील सर्वात विश्वासार्ह न्यूज पोर्टल

बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ | पुणे | पिंपरी - चिंचवड | मावळ | खेड

# ‘ग्रामीण प्रभावी उपक्रम’च्या माध्यमातून दिलेल्या शब्दाची पूर्तता; आदिवासी विद्यार्थिनीला सायकल भेट

पिंपरी, प्रतिनिधी : डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी येथील क्विक हिल फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लबच्या वतीने क्विक हिल फाउंडेशनच्या ‘माय डाटा, माय रिस्पॉन्सिबीलिटी ’ या यंदाच्या संकल्पनेअंतर्गत ‘थिंक बिफोर यु क्लिक’ या यावर्षीच्या थीमच्या माध्यमातून विविध सायबर जनजागृती व सामाजिक प्रभाव उपक्रम राबविण्यात येत आहेत. डिजिटल जगतातील वाढत्या सायबर धोक्यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासोबतच, समाजातील विविध घटकांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक ती मदत पोहोचविणे, हा या उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश आहे. सायबर सुरक्षेचा संदेश देताना सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून जपण्याच्या उद्देशाने ‘ग्रामीण प्रभाव उपक्रम’ राबविण्यात येत आहे.




गेल्या २१ ऑगस्ट रोजी निगडे गावातील एका आदिवासी विद्यार्थिनीला Rural Impact -ctivity अंतर्गत शाळेत जाण्यासाठी तिला सायकल भेट देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. दिलेला शब्द पाळत ४ सप्टेंबर रोजी CyberWarriors Clubच्या वतीने विद्यार्थिनीला सायकल भेट देण्यात आली. आर्थिक अडचणींमुळे शक्य न झालेली ही गरज पूर्ण करून तिच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा हा अर्थपूर्ण प्रयत्न ठरला. सायकल स्वीकारताना विद्यार्थिनी व तिच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तिची परिस्थिती समजून घेऊन दिलेले आश्वासन प्रत्यक्षात पूर्ण केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत क्लबचे मनापासून आभार मानले. या मदतीमुळे विद्यार्थिनीच्या शैक्षणिक प्रवासाला मिळालेल्या आधाराबद्दल कुटुंबीयांनी विशेष कौतुक व्यक्त केले.

यावेळी सायबर वॉरियर्स क्लबचे समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर सर, समन्वयिका आशा कुंजीर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवडे मॅडम, शाळा समिती अध्यक्ष भांगरे सर तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचारीवर्ग उपस्थित होते. विद्यार्थिनीला सायकल मिळाल्याने तिच्या शाळेच्या प्रवासातील अडचण कमी होणार असल्याचे उपस्थितांनी नमूद करत या उपक्रमाचे कौतुक केले.

या संपूर्ण उपक्रमास क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. डी. वाय. पाटील ए.सी.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजित पाटील यांच्या सहकार्याने आणि क्विक हिल फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लबच्या सायबर वॉरियर्सच्या पुढाकारातून सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून जपण्यात आली.